Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# सोनकोळी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)**
विभागप्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
दूरभ्रमणध्वनी : ७५०७८२४३९८,
९८५०१५७७२५, ८९७५९४९८२०
Email Id : bhujadepramila@gmail.com

**गोषवारा :**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. देशात विविध जाती, जमाती, धर्म, संप्रदाय, पंथ, समाजातील लोक वास्तव्य करतात. त्यातील एक समाज म्हणजे सोनकोळी होय. महाराष्ट्रात जे सोनकाळी आहे ते खंडोबाची पूजा अर्चना करतात. प्रस्तुत संशोधन लेखात प्रामुख्याने कोळी समाजातील जी एक उपजात सोनकोळी आहे. त्या जातीचाच अभ्यास यात करण्यात आला आहे. प्रामुख्याने मत्स्यपालन व शेती करणारा हा समाज बेरोजगारी, अंधश्रध्दा, कर्मकांड यात गुंतला जात आहे. या सोनकोळी समाजाचे शास्त्रोक्त अभ्यास व्हावे, त्यांच्या समस्या पार्श्वभूमी जाणून घ्यावी, या करीता दुय्यम स्त्रोताच्या सहाय्याने अभ्यास करण्यात आला आहे. तसेच यांच्या समस्यावर दिलेल्या उपाययोजना निराकरण करणाऱ्यास सहकार्य करतील असा ही आशावाद आहे. म्हणून जमात संस्था अस्तित्वात असणाऱ्या या समाजाचे शास्त्रोक्त अभ्यास करण्यात आले आहे.

**बीजसंज्ञा : सोनकोळी, कोळी, जमात, संस्कृती, माार्तिकप्रथा**

**पार्श्वभूमी :**

महाराष्ट्रातील कोळी समाजात सुध्दा निरनिराळे जाती आहेत, जसे कोळी, मांगेला कोळी, भोई कोळी, वैती कोळी, सोनकोळी, ख्रिश्चन कोळी इत्यादी. कोळी समाज हा मानवी समाज आहे. मुख्यत: महाराष्ट्र गोवा, गुजरात किनारपट्टयावर यांची वस्ती आहे. कोळी लोकांचा एक पोटभेद. सोनकोळी लोकांची वस्ती उत्तर कोकण किनाऱ्यावर वसईपासून रत्नागिरीपर्यंत आहे. मुंबईच्या वेसावा किंवा वरसोवा, दांडा, वरळी, कुलाम, मांडवी, चौपाटी, माझगाव, धरावी, माहीम शीव इत्यादी भागात सोनकोळयांची बरीच वस्ती आहे. इ.स. च्या १५ व्या शतकापासून ते इथे राहिलेले आहेत. सोनकोळी लोकांना हे नाव का ? मिळाले, याबद्दल हे लोक उपपत्ती सांगतात की, खंडोबा या त्यांच्या देवाला भंडार फार प्रिय आहे. भंडार म्हणजे हळद. ते रोज आपल्या कपाळी भंडारा लावतात व सणासुदीच्या वेळी खूप भंडार उघडतात. भंडाराचा रंग सोन्यासारखा पिवळा असतो. म्हणून आपल्याला सोनकोळी हे नाव मिळाले असे सांगतात. थळकट, गावकर, ख्रिश्चन कोळी आणि नवहिंदू असे सोनकोळयांचे चार भेद आहेत. गावकर आणि थळकट यांच्यात पूर्वीपासून रोटी व्यवहार होत असे. पण हल्ली बेटीव्यवहारही होऊ लागला आहे. गावात काही कोळी काळे, बाबऱ्या ओठांचे, पसरट नाकाचे दिसतात. तर काही गव्हाळ उजळ रंगाचे, सरळ नाकाचे व भव्य कपाळाचे दिसतात. सर्वसामान्य कोळी पुरुष मध्यम उंचीचा, दणकट, रुंद, खाद्यांचा आणि भरीव बांध्याचा असतो. कोळी स्त्री सडपातळ, बांधेसूद व रेखीव अवयवांची असते. तिचा केशसंभार विपुल असतो. सोनकोळी हे कष्टादार, प्रामाणिक, उदार, पापभीरू व अतिथ्यशील असतात. तसेच ते उधळया स्वभावाचे असतात. दारुची त्यांना विशेष आवड असते. कारण समुद्रावर काम करतांना त्यांना कित्येक दिवस व रात्री थंडीवाऱ्यात काढाव्या लागतात आणि दिवसांतून अनेक तास त्यांना कमरेइतक्या पाण्यात राहावे लागते. म्हणून त्यांना दारु पिण्याची फार गरज भासत असावी.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) सोनकोळी समाजाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२) सोनकोळी समाजाच्या समस्या ज्ञात करणे.
३) सोनकोळी समाजाच्या समस्यावरील उपाययोजना आखणे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

**संशोधनाचे गृहितक :**

१) सोनकोळी समाजाची अजूनही प्रगती होणे आहे.

२) सोनकोळी समाजात अंधश्रध्दा, विवाहविषयक कर्मकांड, स्त्रीव्यवसाय, बेरोजगारी समस्या वाढतांना दिसून आली.

३) सोनकोळी समाजात स्त्रियांचा दर्जा दुय्यम प्रतीचा आहे.

**संशोधन पध्दती :** वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन :**

सोनकोळी समाजाच्या अध्ययनाकरीता इंटरनेट, पुस्तक, मराठी विश्वकोश, विकीपीडीया यांच्या सहाय्याने अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचे महत्व :**

सोनकोळी समाजाबद्दलची माहिती समाजाला ज्ञात झाल्यास अजूनही या समाजाच्या प्रगतीकरीता काय करु शकतो, या करीता संशोधनात्मक दिशेने वाटचाल सुरु होईल व उपाययोजनाच्या अंमलबजावणीने या समाजाचा विकास साध्य करता येईल.

**संशोधनाची मर्यादा :**

महाराष्ट्रात जो कोळी समाज राहतो त्यात कोळी समाजातच काही उपजाती आहे. परंतु त्या सर्व समाजाचा इथे समावेश न करता फक्त सोनकोळी समाजाच अभ्यास करण्यात आला आहे.

**पुरुष वेशभूषा :** सोनकोळी पुरुष काम करताना आणि घरात वावरतांना कमरेभोवती एक लंगोटी नेसतात. सुर्का म्हणजे बहुधा तांबडया रंगाचा मोठा चौकोनी रुमाल असतो. हा सुर्का लंगोटी सारखा कमरेभोवतालच्या दोरीच्या आधाराने कचून आवळलेला असतो आणि पुढे तो पंख्यासारखा सोडलेला असतो. अंगात तो लांडया हाताची कोपरी घालतो. ही साध्या कापडाची असते. हिवाळयात मात्र तो गरम कापडाची कोपरी घालतो. बाहेर जाताना पुरुष धोतर नसतो किंवा पैरण किंवा बंडी घालतो. थंडीच्या दिवसात तो गरम कापडाची बंडी घालतो. पूर्वी सणा समारंभाच्या वेळी प्रतिष्ठित कोळी पुरुष पांढरा अंगरखा, पांढरे उपरणे आणि डोक्याला टोपरे नावाचे कानटोपीसारखी उंच लाल टोपी घालीत असे. सांप्रत इतर मध्यमवर्गीय हिंदू पुरुषाप्रमाणे तो सदरा, कोट आणि वनातीची किंवा मखमलीची काळी टोपी घालतात. कोळी नवरा मुलगा जुन्या मराठा सरदारासारखा वेष करतो. लांब पांढरा जामा, तंग पांढरी सुरवार कुमारपट्टा आणि डोक्याला भरजरी मंदील असा त्याचा वरवेष असतो. पूर्वी कोळी पुरुष कमरेभोवती करगोटयासारखा चांदीचा जाडजूड पोंद वापरीत असत आणि दंडावर चांदीचा गाढा घालीत. आता हे दागिने क्वचितच दिसतात. जाळे नीट करणाऱ्या कोळयाच्या गळयात दोरीला अडकवलेले एक लहानसे चाकूचे पाते असते. त्याला काती म्हणतात.

**स्त्री वेशभूषा :—** नऊवारी साडी, चोळी आणि फर्का असा कोळी स्त्रीचा वेष असतो. कमरेइतक्या पाण्यात काम करायचे असल्यामुळे ती कसौटी कचून घालते. साडीच्या पुढच्या निऱ्याही पंख्यासारखा पसरुन वर खोचल्यामुळे आकर्षक दिसतात. फर्का म्हणजे तलम पांढऱ्या कापडाची ओढणी होय. हा फर्का त्या वक्षस्थळावरुन खांद्यावर टाकतात. वयात येईपर्यंत कोळी मुलगी खांद्यावरुन पदर न घेता तो कमरेभोवती लपेटते. गावकर मुली लग्न होईपर्यंत खांद्यावरुन पदर घेत नाहीत. सणासुदीला कोळी स्त्रिया भरजरी पैठण्या नेसतात आणि रेशमी किंवा मखमली चोळया घालतात. आपल्या भरदार अंबाडयावर त्या रोज एखादे फूल खोचतात. लग्नापूर्वी मुली हातात काचेच्या किंवा सोन्याच्या बांगडया घालतात. पण लग्नानंतर त्या फक्त डाव्या हातात बांगडया घालतात. समुद्रावर काम करणाऱ्या नवऱ्याला कसल्याही संकटाची बाधा होऊ नये म्हणून हाताच्या बांगडया आपण समुद्र देवतेला अर्पण केल्या असे ते सांगतात. उजव्या हातात त्या चाळीस ते साठ तोळे वजनाचा जड असा चांदीचा वाळा घालतात. याशिवाय ओल्याची किंवा ठशाची बांगडी त्या हातात घालतात. सोन्याच्या तारेत एक मोती, एक पोवळे आणि एक सोन्याचा मणी गुंतवून त्या नाकात घालतात. गळयात सोन्यांच्या मण्यांचे व पोवळयाचे गाठी आणि ‘डुलेरी’ हार घालतात.

**आहार :—** भात आणि मासे हे या लोकांचे मुख्य अन्न होय. त्यांच्या जोडीला अधून—मधून हे लोक मांस, अंडी, भाज्या, डाळी व फळे खातात. सणासुदीला हे लोक घाऱ्या किंवा बडे, मोकल, मुंगवरी इ. पक्वान्ने करतात.

**व्यवसाय :—** सोनकोळी लोकांचा मुख्य व्यवसाय म्हणजे समुद्रावर जाऊन मासे पकडणे हा आहे. त्यामुळे समुद्राच्या भरती ओहोटीशी त्यांचा दिनक्रम असतो. समुद्रात जाऊन मासेमारी करणाऱ्या पुरुषाचा दिनक्रम भरतीच्या व ओहोटीच्या वेळी निराळा असतो. भरतीच्या वेळी तो समुद्रात जाऊन मासे पकडतो आणि समुद्र व वारा अनुकूल असेल तेव्हा किनाऱ्यावर परत घेतो. पकडून आणलेले मासे किनाऱ्यावरील व जेवण करुन पुन्हा समुद्रावर जातो. ओहोटीच्या वेळी त्याला थोडा आराम मिळतो. पहाटे उठून आपले पडाव घासणे, धुणे, त्यांना रंग देणे, जाळी नीट करणे, नवीन जाळी विणणे इत्यादी कामे त्याला करावी लागतात.

**स्त्री व्यवसाय :** सोनकोळी स्त्री फार कष्टाळू आणि उद्योगी असते. ती साधारण पहाटे चार वाजता उठते. स्नान करुन न्याहारी तयार करते आणि थोडे खाऊन लगेच बाजारात जाते. मासे विकून दुपारी ती घरी येते आणि मग दुपारचा स्वयंपाक करते. मग वाळलेल्या माशांची प्रतवारी लावते. संध्याकाळी पुन्हा घरातली भांडी घासणे, कपडे धुणे, केर काढणे, रात्रीचा स्वयंपाक करणे ही कामे तिला करावी लागतात. या गडबडीत ही संध्याकाळी स्नान करायला ती विसरत नाही. सर्व आटपून झोपायला तिला रात्रीचे अकरा वाजतात. घरात सासू, आई किंवा मुलगी असली तर ती बरेचसे घरकाम करते आणि गृहिणीला थोडी मोकळीक मिळते. सोनकोळी मुलगी साधारण पाच वर्षाची झाली की धाकटया भावडांना सांभाळू लागते. नंतर सहा—सात वर्षाची झाल्यावर घरातला केर काढणे, भांडी घासणे, मासे वाळवणे इत्यादी कामे ती करु लागते आणि अकरा—बारा वर्षाची झाली की बाजारात गेली असता स्वयंपाक करणे व वाढणे ही कामेही करते.

**विवाह प्रथा :** मुलांची लग्ने साधारणपणे वीस ते पंचवीस व मुलींची सोळा ते वीस या वयात होतात. आई बाप लग्न ठरवतात. निरोगी, सशक्त, अव्यंग व कामसू मुलगी ही आदर्श वधू समजली जाते. प्रथम एखाद्या मुलीची व मुलाची पत्रिका जुळते का नाही ते पाहतात. ती जुळल्यास मध्यस्थामार्फत मुलीला मागणी घालतात. मुलीसाठी दहेज द्यावे लागते. हे दोन्ही पक्षांच्या ऐपतीनुसार ठरवतात. लग्न ठरल्यावर साखरपुडा करतात. तो रात्रीच्या वेळी होतो. त्यासाठी वराकडची माणसे कंदील, हलवा, शेवगाठी व दारु या वस्तू घेऊन मिरवीत वधूग्रही जातात. तिथे एका खोलीत मध्यभागी बाक ठेवलेला असतो. त्याच्या दोन्ही टोकांना दोन समया लावून ठेवलेल्या असतात. त्या बाकावर वरपक्षाने आणलेल्या वस्तू ठेवतात. मग दोन्ही पक्ष लग्न नक्की करायचे असे ठरवतात. सर्वांना शेवगाठी, हलवा, चहा किंवा दारु वाटतात.

लग्नात पहिला विधी हळद लावणे हा असतो नंतर तिला भगताच्या घरी नेतात. तिथे तिच्या केसांच्या बटेची एक लहानशी गाठ मारतात. भगताकडच्या देवाला पाच व कुल देवतेला पंचवीस नारळ अर्पण करतात. देवापुढे हळद ठेवतात आणि मग ती वधूला लावतात. जात्याची पूजा करुन पाच सुवासिनी त्यात थोडे तांदूळ व उडीद दळतात. वधू—वरांनी सुर्याला नमस्कार करणे, ऐरी नामक घराच्या उतरंडीची पूजा करणे व मांडवाटया दारात लावलेल्या केळी वराने कापणे, एवढे विधी झाल्यावर लग्न समारंभ संपतो.

**प्रसूतिप्रथा :—** पूर्वी स्त्रीची प्रसुती बहुधा सासरी घरीच होत असे. प्रसूतीच्या वेळी सुईण तिला मदत करीत असे. स्त्रीला प्रसूतिवेदना सुरु झाल्या की देवाला नारळ अर्पण करीत आणि तेराव्या दिवशी तो फोडीत. बाळ — बाळंतिणीला बाजेवर झोपवीत आणि चाळीस दिवसानंतर बाज समुद्राच्या पाण्यात तीन दिवस बुडवून ठेवीत. जन्मल्यापासून मुलाला व आईला रोज दोनदा तेल लावून स्नान घालीत. सांप्रत बहुतेक स्त्रिया बाळंतपणासाठी प्रसुती गृहात जातात. सहाव्या दिवशी सटीची पूजा करतात. पूजा पाटयावर मूठभर पोहे, पाच विडयाची पाने पान सुपाऱ्या, बदाम, खारका, नारळ, रुईची व कडुलिंबाची पाने, दिवा, सव्वा रुपया इत्यादी वस्तू ठेवतात. पाटयाजवळ आई मुलाला घेऊन झोपते. नंतर सुईण दारात जाऊन सुपाची पूजा करते आणि घरात घेऊन निंबाच्या फांदीने मुलावर पाणी शिंपडते आणि कावडयाला, वाघाला, जनावराला, माणसाला वगैरे भिऊ नको असे सांगते. मग आई पाटयाजवळ विडा दक्षिणा ठेवून पाटयाला नमस्कार करुन सुईण

तिची ओटी भरते आणि 'सटीतून सुटका झाली का' असे तिला विचारते. रात्री सटीदेवी येऊन मुलाचे भविष्य लिहिते, अशी समजूत आहे.

**देवधर्म** :— खंडोबा, भवानी किंवा एकवीरा हे या लोकांचे कुलदैवते आहेत. खंडोबाचे स्थान जेजुरीला आणि एकवीराचे कार्ल्याजवळ आहे. ग्रामदेवतांना ही ते भजतात. वेताळदेवी, हिंगलादेवी, हरबादेवी, मरुबाई, बायदेव, भावकादेवी इत्यादी देवीदेवतांची ते पूजा करतात. देवकर आणि इरकर असे दोन भेद आहेत. भगत त्यांचा मुख्य असतो.

**सण** : चैताचा सण, नारळी पौर्णिमा, गौऱ्या, भवान्या, मादी पुनव, होळी पुनव, दिवाळी, गोकुळाष्टमी महत्वाचे सण आहे तर सोनकोळी चंद्राला दिवटी ओवाळतात.

**जमात** : अनेक कुटुंबाची मिळून त्यांची जमात नामक एक सामाजिक संस्था असते. पाटील हा तिचा मुख्य असतो. त्याला मदत करण्यासाठी काही प्रतिष्ठित लोक असतात त्यांना पंच म्हणतात. जातीतील लोकांचे तंटेब खेडे खोडवून न्याय देणे हे पाटलाचे मुख्य काम असते. लोकांच्या लग्नकार्य प्रसंगी उपस्थित राहणे हेही त्याचे काम असते. पाटलाच्या मदतीला भरवी नामक एक गावात दवंडी पिटणारा असतो. वादळ, रोगांच्या साथी, शेजारपाजारच्या गावच्या जत्रा, जमात सभा इत्यादींची माहिती ती लोकांना ओरडून सांगतो. त्याबद्दल त्याला होडीतून मूठभर मासे मिळतात.

**मार्तिकप्रथा** : हे लोक मृतांना जाळतात. देवी, पटकी इत्यादी साथींच्या रोगांनी मेलेल्यांना मात्र पुरतात. गर्भिनी मृत झाल्यास तिचा गर्भ बाहेर काढून पुरतात व नंतर तिला जाळतात.

**उपाययोजना** :

- सोनकोळी लोक भूताखेतांवर विश्वास ठेवतात कारण चित्तेवरुन दोन शस्त्र पूर्व व पश्चिमे कडून फेकतात. यातून हे किती अंधश्रध्दाळू आहेत लक्षात येते, समाज प्रबोधनाच्या माध्यमातून किंवा अंधश्रध्दा निर्मूलन समिती द्वारा यांच्यातील अंधश्रध्दा दूर करणे गरजेचे आहे.
- आज जमात नामक संस्थाला कालामानाप्रमाणे कमी महत्व राहले आहे, त्यामुळे तंटामुक्त गाव योजनाप्रमाणे गावातील समस्या व प्रश्नांचा गावातच निपटारा होणे गरजेचे होते मात्र आज हे लोक न्यायव्यवस्थेमुळे धाव घेतांना दिसत आहे.
- आजही सोनकाळी लोकांत आहेर प्रथा आहे त्यामुळे रुसवे—फुगवे समाज बांधवामध्ये आढळून येत आहे. आहेर प्रथा बंद व्हायला पाहिजे.
- पावसाळयात या लोकांना मच्छिमारीचे काम मिळत नाही. त्यांना घरातच राहावे लागते. कधी—कधी उपासमारीची ही वेळ त्यांच्यावर येते. असे होऊ नये याकरीता पतसंस्था मार्फत, सोबतीला अन्य व्यवसायांचे प्रशिक्षण व कर्ज पुरवठा बँकामार्फत व्हायला पाहिजे.
- विवाह प्रथा वेळ खाऊ विधि आहे. त्यामुळे संस्कार, विधी, कर्मकांड कमी करण्याकरीता व वेळ, श्रम, पैशाची बचत कशी होणार याकरीता प्रबोधन, सामूहिक विवाह प्रथा अस्तित्वात आल्यास लागणारा पैसा वाचू शकतो.
- आजही सोनकोळी परंपरागत स्वरुपाने मासेमारी करतात. त्यामुळे दोन वेळ पोटभर अन्न मिळेल इतके ही त्यांना मिळत नाही. व्यावसायिक मत्स्यपालन, बाजारपेठापर्यंत मासे पोहचविणे, ते टिकून रहावे याकरीता आधुनिक मत्स्यपालन शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य दिल्यास पावसाळी बेरोजगारी कमी होऊ शकेल.
- आधुनिक समाजा सोबत तादाम्तीकरणाची प्रक्रिया सुरु झाल्यामुळे यांच्या स्त्री—पुरुष वेशभूषेत बदल होत आहे. पारंपारीक संस्कृतीची जोपासना म्हणून सांस्कृतिक केंद्र उभारणे गरजेचे आहे.
- कोळी समाजाचे लोकगीत, साहित्य, व्यवसाय करण्याची पध्दती त्यांची संस्कृती संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेमुळे लोप पावते की काय ? अशी शंका येत आहे. तेव्हा यांचे नृत्य, लोकगीत लिपीबद्ध झाल्यास संस्कृतीचे जतन, रक्षण, संवर्धन, संचय होण्यास मदत होईल.
- आजही २१ व्या शतकात वास्तव्य करत असतांना जेव्हा समाजाने आधुनिकतेची कास धरली आहे, तेव्हा ही स्त्री—पुरुष समानता हे नावाला दृष्टिगोचर होत आहे. अजूनही या समाजात स्त्रीचा दर्जा दुय्यमच आहे.

- या समाजात सामाजिक, सांस्कृतिकदृष्टया लिंगभाव समानता आल्यास महिला वर्ग प्रगती करु शकेल.
- ज्या महाराष्ट्रात इतके समाजसुधारक होऊन गेले, तिथे आज ही अनेक वादात अडकलेला हा समाज आढळून येतो, ऑगस्ट कॉम्टच्या प्रत्यक्ष वादाप्रमाणे वैज्ञानिक जाणीवा, तार्किकता निर्माण झाल्यास संपूर्ण समाज ऊर्ध्वगामी दिशेने गतिशील होण्यास मदत होऊ शकेल.
- जननी सुरक्षा योजनाची माहिती सोनकोळी समाजापर्यंत पोहचविणे गरजेचे आहे, बहुतांश प्रसुती घरीच केली जाते. दारिद्रय रेषेखालील जीवनयापन करणाऱ्या स्त्रीला संस्थागत प्रसूती करीता जे आर्थिक सहाय्य दिले जाते ते स्त्रीवर्गापर्यंत त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहचविल्यास गर्भिणी माता मृत्यूचे प्रमाण नगण्य होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ**


- Desai Dev – in the pursuit of a Better way
- Puneka Vinaja B. – The son Kolis of Bambay Popular Book Depo.
- Desai Dr. Cherana
- Mr. M. Wikipedia.org.wiki / कोळी
- https://gautambookcenter.com
- https://hi.m.wikipedia.org
- http://www.jagran.com